# बिइंग वुमन

पुणे * वर्ष ४ * अंक ६ * ऑगस्ट २०२३ * पाने २०

इंद्रधनुष्याच्या बांधित कमानी
संध्येच्या गगनी श्रावण आला
लपे ढगामागे, धावे माळावर, असा
खेळकर श्रावण आला



पुणे ⁕ वर्ष ४ ⁕ अंक ६
ऑगस्ट २०२३ ⁕ पाने २०

RNI No. MAHMAR/2019/78753

**मुख्य संपादिका**
रोहिणी वांजपे : ९८२२८६२२५५

**उप-संपादिका**
चित्राली ओक-कुलकर्णी : ९८५०९५८४३१

**कॉर्पोरेट कमर्शियल्स**
शुभांगी नांदुरकर : ८५५२८५७७७९

**सोशल मीडिया को-ऑर्डिनेटर** Technovibes
निलिमा शहाणे : ८३०८४०४४५५

**संपर्क कार्यालय**
'बिइंग वुमन'
६०३, फिफ्थ अव्हेन्यू , कोथरूड
सिटीप्राईड थिएटर जवळ, पुणे ४११०३८
editorial@thebeingwoman.com
www.thebeingwoman.com

नमस्कार मैत्रिणींनो,
बिइंग वुमन हे व्यासपीठ आहे तुमच्या अव्यक्त भावना व्यक्त करण्याचे. अनेकदा लिखाणाची आवड असते, पण प्लॅटफॉर्म मिळत नाही. असंच छानसं लिहिलेलं प्रसिद्ध करायचंय?
मग बिइंग वुमन आहे ना...
आजचं तुमचे लेख, कथा, कविता आम्हाला खालील ईमेल वर पाठवा.
editorial@thebeingwoman.com

# अनुक्रमणिका

संपादकीय ........................................ ३

अधिकस्य अधिक फल ............................. ४

पूजिते मंगळागौर .................................... ६

Photography ......................................... ८

सरीवरसरी ........................................ १०

हसत खेळत शिका शास्त्रीय संगीत! ............ १३

संपूर्ण राष्ट्रगीत ..................................... १४

बाप नावाचा माणूस (कथा स्पर्धा) ............. १५

Anxiety ............................................ १८

''बिइंग वुमन' हे पाक्षिक मालक, प्रकाशक व मुद्रक रोहिणी अरुण वांजपे यांनी एकविरा पब्लिसिटी, ए १२, निखिल पार्क , 'सी ' सोसा., माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे ४११०५१ येथे छापून फ्लॅट नं. सी ११, संगीता सीएचएस, ताडीवाला रोड, पुणे ४११००१ येथून प्रसिद्ध केले. संपादक - रोहिणी अरुण वांजपे
(प्रसिद्ध केलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# संपादकीय



या अंकात सर्वांचे मनापासून स्वागत. सर्वप्रथम स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

अधिकमास आणि त्यात पुढे येणारा श्रावण महिना. 'अधिकस्य अधिकं फलं' नुसार दान हे श्रेष्ठ दान आहे. या अंकात अधिक मासाची माहिती सांगणारा लेख प्रज्ञा कुलकर्णी यांनी लिहिला आहे. डॉ. अनघा हिंडलेकर यांची शास्त्रीय संगीतात पी.एच.डी. असून शास्त्रीय संगीताचा प्रसार करणे हे त्यांचे ध्येय आहे. त्यांनी शास्त्रीय संगीत विषयावर सुंदर लेख दिला आहे. या अंकात अनेक नवनवीन लेखिकांचे लेख आहेत. ज्यांना लिहिण्याची इच्छा आहे त्यांच्यासाठी बिइंग वूमनचे हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आमचा उद्देश एक एक पाऊल पुढे जात आहे. आमच्या व्हॉट्सॲप ग्रुपबरोबर ४०० पेक्षा जास्त मेंबर कनेक्ट झाले आहेत. बिझिनेस आणि विचारांची देवाणघेवाण किंवा एखादा अनुभव लिहून पाठवला जातो. काही जणींना नवीन मैत्रिणी मिळाल्या आहेत. एकंदरीत काय बिइंग वूमनला नवीन लेखिका आणि वाचक वर्ग जोडला जातो आहे.

यावेळी आलेला पाऊस हा हिमालयातील राज्यांचे नुकसान करतो आहे, पण निसर्गाची आपण काळजी घेतली तर निसर्ग आपली काळजी घेतो हेच यातून शिकायचे. जगभरात पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. जागतिक स्तरावर याचे प्रबोधन चालले आहे. आपले पर्यावरण आपणच वाचवले पाहिजे ती काळाची गरज आहे.

सध्या मी नेपाळमध्ये आहे. इथे त्यांचा श्रावण सुरू झाला होता सगळ्या बायका, मुली सगळ्यांनी मेंदी लावली होती आणि हिरव्या बांगड्या घातल्या होत्या. अगदी सगळया डॉक्टरस्, स्टुडंट्स, आमच्या गावातील बायका आणि हिरव्या रंगाचे कपडे सगळ हिरवं. मी विचारल्यावर त्यांनी सांगितले की, सावन सुरू झाला. हिरवा रंग निसर्गाचा रंग, श्रावणाचा रंग म्हणून हे मेंदी, बांगड्या. मला ही कन्सेप्ट खूप आवडली. मी पण सांगितले की आम्ही नागपंचमीला मेंदी लावतो, बांगड्या भरतो. हिंदू राष्ट्र असल्याने आपल्या त्यांचे रीती रिवाज बरेचसे एकच आहेत.

या अंकात विविध विषय आहेत. कुंदा कुलकर्णी यांनी मंगळागौरीच्या खेळाची माहिती देणारा लेख पाठवला आहे. निलीमा क्षत्रिय यांचा सरीवर सरी या लेखात प्राग या सुंदर राजधानीचे वर्णन केले आहे. आजकाल मोबाईल वरून आपण मनसोक्त कितीही फोटो काढतो. पण फोटोग्राफी करिअर म्हणून निवडणे आणि ते यशस्वीरित्या चालवणे या विषयी अभिजित गुजर यांनी फोटोग्राफी दिनाबद्दल लेख दिला आहे. भारताचे राष्ट्रगीत सर्वांना पाठ असते पण ते संपूर्ण गीत या अंकात आहे. नुकतेच anxiety या विषयावर एक सेमिनार घेण्यात आले त्यालाही महिलांचा भरपूर प्रतिसाद लाभला. पुढील महिन्यात असेच अनेक नवीन कार्यक्रम तुमच्या भेटीला घेऊन येण्यासाठी टीम बिइंग वुमन सज्ज आहे.



# अधिकस्य अधिकं फलं

*एक आटपाट नगर होतं. आट म्हणजे लांब आणि पाट म्हणजे रुंद. नगरीचा राजा अगदी सत्शील, सदाचारी प्रजाहितदक्ष जाणता राजा होता. राजा प्रजेसाठी झटत होता आणि प्रजा राजावर प्रेम करत होती. राजाला त्याच्यासारख्या विचारांच्या राणीची सक्षम साथ मिळाली होती. राजा, राणी, प्रजा अगदी सुखात होते. (राजा-राणीच्या गोष्टीत सगळं काही सुखात आणि उत्तम चालू असण्याच्या टप्प्यावर नेहमी 'पण' येतो. पण राजाला अपत्य नव्हतं किंवा पण अमुक तमुक नव्हतं. पण इथे असं काही नाही) राजाची मुलं त्याच्यासारखीच होती. आई-वडिलांचा आदर करणारी, 'प्रजाजनांची काळजी घेण्यासाठी राजा आहे' याची सर्वार्थाने जाणीव असणारी होती. एकदा राजा घनदाट जंगलात शिकारीला गेला असताना झाडाखाली निवांत बसला होता. अशा निवांतक्षणी राजाच्या मनात एक वेगळाच विचार आला. (राजा-राणीची गोष्ट नेहमीच्या गोष्टींपेक्षा वेगळं वळण घेते ते इथे या टप्प्यावर) राजाच्या मनात एक निराळाच विचार आला. जो तुम्हा आम्हाला कधी जाणवत नाही. सगळंकाही सुरळीत, मनाजोग आणि छान चाललेलं असताना तर अजिबातच नाही. राजाच्या मनात आलं, 'मला जे इतकं सुख आणि वैभव मिळाल आहे, भोवती समविचारी लोक आहेत आणि जे काही सदोष आहे ते सुधारण्याची शक्ती माझ्याकडे आहे हे सगळं मला का बरं मिळाल असेल? मनात आलेला हा विचार काही राजाला स्वस्थ बसू देईना. राजाने खूप विचार केला. खूपखूप विचार केला पण राजाला कारण काही कळेना.*

*राजाला काही उत्तर सापडेना आणि जंगलात झाडाखाली बसलेला राजा जागचा हलेना. शेवटी झाडावर बसलेल्या एका पोपटाने खाली येऊन राजाला सांगितलं, ''राजा तुझ्या मनातल्या प्रश्नांचे उत्तर मला ठाऊक आहे. तुला जे काही सुख समाधान आणि ऐश्वर्य मिळालं आहे ते तुझ्या गतजन्मीच्या वागण्याने मिळत आहे''. राजाच्या मनाचे समाधान झालं आणि राजाच्या मनातल्या सतावणाऱ्या प्रश्नांची जागा कृतज्ञतेने घेतली. मनाचा गाभारा कृतज्ञतेच्या धुपाऱ्याने भरून गेला आणि त्याचा सुगंध आसमंतात दरवळला.*

जे काही मिळालं ते आपल्या कर्तृत्वाने मिळालं आणि आयुष्यात जे काही कमी आहे ते नशिबाने असं मानणं ही सामान्यपणे मानवी प्रवृत्ती असते. या गोष्टीचा पुनर्विचार माणसाने करावा म्हणून हैह देशाचा राजा दृढधन्वा आणि त्याची राणी गुणसुंदरी यांची ही कथा अधिक मासाच्या पोथीत आली आहे. यावर्षीचा श्रावण महिना अधिकमास आहे त्यानिमित्त विविध प्रकारची व्रत, दान कदाचित आपण केली असतील. हा लेख आपण वाचाल तोपर्यंत चंद्रमास आणि सौरमास यामधला दरवर्षी पडणारा दहा दिवसांचा फरक भरून काढण्यासाठी आपल्या पूर्वजांनी लावलेली ही व्यवस्था आहे. यासाठी अधिकमासाची तांत्रिक माहिती आपण अन्यत्र वाचलीही असेल.

अगदी महत्त्वाच्या काही मुद्द्यांकडे आपलं लक्ष



**डॉक्टर प्रज्ञा कुलकर्णी**

या लेखाच्या माध्यमातून मला वेधायचं आहे. पहिली गोष्ट– कृतज्ञ भावना आणि त्यातून घडलेलं दान. आपल्याला मिळालेलं सुख, ऐश्वर्य हे आपल्या आधीच्या जन्माच्या सत्कृत्यांमुळे मिळालेलं आहे. ही गोष्ट मान्य केल्यावर या जन्मही चांगलं वागणं आणि पुढच्या जन्मीच्या सुखाची तजवीज करून ठेवण आलंच आणि त्या चांगल्या वागण्याचा एक भाग म्हणून दान करणे हा अधिकमासाच्या व्रताचा भाग म्हणून सांगितला जातो. अधिकस्य अधिकं फलं. अधिक महिन्यात केलेल्या दानाचं, सत्कृत्याचं फळ जास्त मिळतं असं मानलं आहे. आता यातल्या पुनर्जन्म, पाप–पुण्य, व्रत यांसारख्या संकल्पनांवर अनेकांचा विश्‍वास नसेल. तरीही अगदी साधी गोष्ट आहे. आपण कोणाला काही दिलं किंवा आपल्याला कोणी काही दिलं तर नक्कीच आणि नेहमी समाधान मिळतं. तेव्हा स्वतःला सुखावणारही समाधान मिळवून आपल्या हातात आहे, हे लक्षात घेऊन ते मिळवता येणं नक्की शक्य आहे.

या महिन्यात सूर्य रास बदलत नाही. या महिन्यात लग्न, मुंज, वास्तुशांती यासारख्या गोष्टी केल्या जात नाहीत आणि या महिन्याला ‘मलमास’ म्हणतात. या सगळ्यामुळे हा महिना अशुभ आहे की काय? असंही काहींना वाटतं. वास्तविक पाहता ‘मल’ शब्दाला अनेक अर्थ आहेत. त्याचा अर्थ असा गंज, साठलेली घाण, शरीरातून उत्सर्जित होणारे मलमूत्र, अश्रू, कान–नाकातील घाण, अशुद्ध रक्त, घाम असा आहे. तसेच त्याचा अर्थ पाप, कापूर, अशुद्धी असेही आहेत. थोडक्यात काय तर मनातलं पाप, मलीन वृत्ती धुण्याची संधी देणारा असा हा महिना आहे.

म्हणूनच मनातलं सगळं मळभ दूर सारून तिथे सदविचारांची स्थापना करण्यासाठी हा अधिकमास वापरणे अगदी शक्य आहे. आपल्याला जे काही मिळालं आहे त्यासाठी मनात कृतज्ञ भाव जागवणं आणि तो दान देण्याच्या मार्गाने व्यक्त करणे यासाठी हा अधिकमास साजरा करणं शक्य आहे.

भारतीय परंपरेत कुठल्याही व्रताचा भाग म्हणजे एखाद्या देवतेची पूजा करणे, काहीतरी आवर्जून करणे आणि काहीतरी आवर्जून टाळणे असे असल्याचे पुराण ग्रंथात दिसतं. या महिन्याला ‘पुरुषोत्तम मास’ असंही म्हणतात. श्री विष्णूची पूजा करतात. भगवान विष्णूंच रूप अनेक ठिकाणी प्रतिबिंबित झालेलं दिसतं. त्यातलाच एक म्हणजे– जावई आणि लेकीला विष्णू आणि लक्ष्मी समजून त्यांना सच्छिद्र वस्तूंच दान देणे, दीपदान देणे, तेहतीस जोडप्यांना अन्नदान करणे. एक ना दोन अनेक मार्ग पण सगळ्यात दिसतो ते म्हणजे दान. दानातून मिळणारे समाधान. खरंतर आपण अनुभवलेलं असतं, आपल्याकडे दान देण्याची क्षमता आहे आणि ते देता येते याविषयी कृतज्ञता असली की आपोआपच ‘मी मिळवलं’ ही ’मी’ पणाची भावना गळून पडते.

कित्येक चांगल्या सवयी दैनंदिन जीवनात उगाचच मागे पडलेल्या असतात. आपल्याला त्या लहान–सहान रोजच्या दिवशी करायच्या गोष्टींचं महत्त्व पटलेलं असतं ते करायचंही असतं. कधीकाळी आपण ते केलेलेही असतं. मग या अधिक महिन्याच्या निमित्ताने व्रत म्हणून ते आवर्जून करता येईल आणि काही वाईट सवयी आवर्जून टाळता येतील. यावर्षीच्या अधिक महिन्याच्या निमित्ताने काहीतरी नव्याने सुरू करूयात आणि या बोनस मिळालेल्या दिवसात चालू केलेल्या गोष्टी पुढे वर्षभर सुरू ठेवूयात .

राजा दृढधन्वाला पडलेला प्रश्न आपल्यालाही पडो. ‘‘मला इतकं सुख, सुदृढ शरीर, शिक्षण, घरदार, नातलग, मित्र का बरं मिळाले? दृढधन्वा राजाच्या गोष्टीमुळे आता आपल्याला समजले की हे सगळं झाले ते पूर्वजन्मीच्या पुण्याने. राजाचं मन जस कृतज्ञतेने भरलं तसेच आपलही भरूदेत आणि आपल्या हातून दान घडून ती कृतज्ञता ओसंडून वाहूदेत. राजाला मिळालं तसं समाधान आपल्यालाही मिळूदेत, अशी ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

**– डॉक्टर प्रज्ञा कुलकर्णी**

(लेखिका पुण्यातील डेक्कन कॉलेजात संस्कृत आणि कोश शास्त्राच्या प्राध्यापिका आहेत. संस्कृती विषयक संशोधक आहेत. ‘‘चंदन गाभा‘‘ नावाचा यूट्यूब चॅनल चालवतात.)

# पूजिते मंगळागौर



'श्रावणमासी हर्ष मानसीः..', कारण नयनरम्य हिरवाईची सर्वत्र उधळण सुरू असते. पावसाची रिमझिम मनाला सुखावत असते. सण- समारंभ, व्रतवैकल्ये यामुळे मरगळलेल्या जनमानसात चैतन्य आलेल असतं. पेरणी, लावणीमुळे शेतकरीराजा खुशीत असतो आणि नववधू नटून-थटून मंगळागौर पूजण्यासाठी आतुर झालेल्या असतात. सासरचे व माहेरचे सारे जण त्यांच्या कोड कौतुकात दंग झालेले असतात. हल्ली बहुतेक मुली नोकरी व्यवसायात दंग असतात. त्यांचे आई-वडील, सासू-सासरे हेही नोकरी किंवा अन्य कशात गुंतलेले असतात. आर्थिक स्थिती बऱ्यापैकी असली, तरी वेळ व कष्ट जिकिरीचे होऊ लागले आहे आणि साहजिकच ममंगळागौर्फया सणाचं किंवा व्रताचं महत्त्वही कमी होऊ लागलेल आहे. पूर्वापार चालत आलेले मंगळागौरीचे खेळ हा आपल्या भारतीय संस्कृतीचा महान ठेवा आहे.



मंगळागौर म्हणजे शिवपार्वतीची पूजा. ती श्रावणात का? तर शंकराला जलाभिषेक अतिशय आवडतो. या महिन्यात सतत जलधारा पृथ्वीला स्नान घालत असतात. म्हणून याच महिन्यात हे व्रत केले जाते. शिव आणि पार्वती हे आदर्श जोडपं आहे. त्यांचं अनोखे प्रेम आणि निष्ठा यांचा आदर्श नवपरणे जोडप्यांच्या मनावर बिंबवावा म्हणून हे व्रत फक्त नवदांपत्यानेच सलग पाच वर्ष आचारावे असा हेतू असतो. हे व्रत आईने मुलीला दिलेले असते व पाच वर्षानंतर मुलीने आईला साडी-चोळी, बांगड्या, मणी-मंगळसूत्र, जोडवी, चांदीचा अगर सोन्याचा नाग असे सर्व सौभाग्य अलंकार, फराळाचा डबा देऊन या व्रताचे उद्यापन करावयाचे असते.

प्रत्येक मंगळवारी नववधूने अभ्यंग स्नान करून रेशमी वस्त्रे, अलंकार परिधान करून तोंडात जिरे-साखर धरून पूजेस बसावे. गुरुजी सांगतील त्याप्रमाणे मनोभावे मंगळागौरीची पूजा करावी. पंचपक्वानाचा नैवेद्य दाखवावा. नंतर आरती, कहाणी वाचन व मौनव्रत पाळून जेवण करावे. सायंकाळी सुवासिनींना हळदी-कुंकू द्यावे. रात्री आरती व भाजका फराळ खाऊन अनेक खेळ खेळून आपले कलागुण देवी पुढे सादर केले, तर देवी प्रसन्न होऊन सौभाग्याचे दान देते अशी श्रद्धा आहे. त्यामुळे नववधू बरोबर वयस्कर स्त्रियाही वयाचं भान विसरून खेळतात. मनमुराद गातात. पोटभर हसतात. हसत-खेळत एकमेकींना टोमणे मारतात.

खिलाडूपणाने इतरांचे टोमणे स्वीकारतात. सारे जण ताणतणाव, कष्ट विसरून अनोख्या आनंदाचा लाभ देणारे हे खेळ उत्तम टॉनिक आहे. खेळ खेळायला जमलेल्या भगिनी सर्व भगिनी आपापला परिचय करून देतात. मग नव्या नवरीला उखाणा घ्यायला लावतात. हल्ली पती-पत्नी एकमेकांना नावानेच हाक मारतात; पण उखाण्यांतून नाव घेणे ही एक कला आहे. त्यात काव्य आहे. एकमेकांचा आदर राखणारी परंपरा आहे. वयस्कर स्त्रियाही नाव घेताना अशा लोभस लाजतात की पतिव्रतेचे तेज पहावं ते याचवेळी असं म्हणावसं वाटतं.

मंगळागौरीच्या खेळाला सुरुवात होते झिम्म्याने. एका हाताचा झिम्मा, दोन हातांचा, तीन हातांचा, सहा हातांचा झिम्मा, लाडू झिम्मा, तिरका झिम्मा, क्रॉस झिम्मा असे अनेक प्रकार खेळले जातात. त्यानंतर सुरू होते फुगड्यांची धमाल. एका हाताची, चौघींची बस फुगडी, निसर फुगडी, दंड फुगडी, गौळण फुगडी, फुलपाखरू फुगडी, तवा फुगडी, योगासन फुगडी, जातं फुगडी, केरसुणी फुगडी, सलाम फुगडी आणि त्यावेळचे उखाणे प्रत्यक्षच बघायला हवेत. यानंतर बांग देतो 'अक्काबाईंचा कोंबडा' पाठोपाठ 'हर घोड्या हर बाजारची वाट' म्हणत बाजारात खरेदीला जायचं. पूर्वी कुठे होत्या व्हीआयपी बॅगा, फॅशनेबल पर्सेस? मग शोधायचं गाठोड सर्वांगाची जुडी करून ते असं काही घरंगळत जात की मन थक्क होतं. मग गाठोड सोडायचं. तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या पाहून खेळ सुरू होतो. 'अडवल धूम पडवल धूम' मग सासू सांगते 'किस बाई किस, दोडका किस' नंतर 'सुपारी' शरीराची प्रत्येक नस मोकळी करून टाकते. नंतर 'नखुल्या' त्यानंतर 'अगं अगं सूनबाई, काय म्हणता सासूबाई' असे सवाल जवाब होतात. भांडणाचा दुसरा प्रकार 'मोर कसा नाचतो?' त्यानंतर 'पिंगा' हा 'तू-तू-मैं मैं' वातावरणात चैतन्य आणतो.

नंतर सुरू होतात सांघिक खेळ. 'फणी लाटा' इतका वेगवान खेळ की, खरोखरच्या लाटांचा अभ्यास निर्माण होतो. त्यानंतर 'होडी' चे तीन प्रकार. मग 'धुणी धुणं', 'लाह्या फोडणे', 'सलाम सालकी', 'ताम तवली' या खेळांपुढे महागडे जिमसुद्धा फिके पडतील. मग येतं



कुंदा कुलकर्णी

'सूप''. त्यातही तीन प्रकार आहेत. 'घूम घुम घुमाक' हा श्वासांच्या ताल-लयींवर चुटक्या वाजवत आवाजाचा व तालांचा चढ-उतार उत्तम सादर करतो. मग सासुरवाशीणींची खंत 'खुर्ची की मिरची' नंतर इतर सख्या समजावतात 'जाशील कैसी?' संसाराच्या परिघात मर्यादेनं राहावं, अशी शिकवण दिली जाते. अधून-मधून मोठमोठे उखाणे, भारुड, जोगवा, भावगीत, नृत्य, छोट्या कथा यांची खैरात असते. 'लाटणं' काटवर कण्या असे अनेक खेळ यात आहेत. मग सुरू होतो 'अखेरचा झिम्मा' 'विठोबा रखुमाई' 'माहेर सोडून चाललीस बाई तू,' 'चाललीस गो सासरला', 'पाण्याने भरलाय डोळा बाईचा', 'जा गो जा सुखी रहा' म्हणताना सर्वांचे डोळे भरून येतात.

असा हा मंगळागौरीचा सण ज्याची माहेरवाशिणी आतुरतेने वात बघत असतात. माहेर आणि सासर यातील नातेसंबंध घट्ट करणारा हा सण आपल्या भारतीय संस्कृतीचा अमुल्य ठेवा आहे.




# PHOTOGRAPHY

***Hello i m a Advertising photographer my self Abhijit Gujar. I'm into photography for last 2 decades.***

***Photography was my passion then came into Profession. Started my carrier with marriage Photography & then with portfolio shoots of Male & Females then with advertising Photography , Industrial photography , Family Portraits, food Photography & Product Photography, I have my own studio in Patil plaza in Pune.***

My wife kalyani is a makeup artist because of her many female models are comfortable with both of us, for commercial shoots kalyani looks after the production of shoots. Recently did photo shots for film publicity shoots,

Worked with many advertising agencies Pan India.

My biggest asset is, I'm handling my camera for more than 2 decades.

Have done many portfolios for celebrities, Food Photo-shoots for many brands, Fashion shoots for clothing, BMW Showrooms all over Maharashtra, Celebrities shoots for many Construction companies etc....

Working with many creative advertising peoples...

Playing with light & shadow gives creative images

Photography has a many subjects, for example, Marriage, Events, fashion, food, landscape, skycaps, nature, travel-photographer etc...

Now a days many new females are also coming in this creative field & exploring their hobbies into Profession.


Classs :- my regular classes are also on for Armatures & for learning further for Professional Photography

As a photography instructor, stay updated with the latest trends and technologies in the industry, ensuring that your students receive relevant and up-to-date information.

Behind every successful photographer, there's often a team that plays a vital role. My better half, Kalyani, is a talented makeup artist who complements my work impeccably. With her expertise, many of our models feel at ease, enabling us to capture their genuine essence and emotions. For commercial shoots, Kalyani efficiently manages production, ensuring a seamless and enjoyable experience for everyone





अभिजित गुजर

involved.

My journey has brought me the privilege of collaborating with numerous advertising agencies throughout Maharashtra. Each project has been an opportunity to push my creative boundaries, delivering impactful visuals that resonate with audiences and clients alike.

In this exciting realm of Advertising Photography, I Abhijit , stand as an artist with a boundless love for creating captivating visual stories. My enduring passion for photography drives me to reach new heights, enriching my portfolio with diverse and stunning works of art.

With the support of my talented team and the enthusiasm of clients and collaborators, I am motivated to continue crafting unforgettable imagery that leaves an indelible mark on the world of advertising. Thank you for being a part of my creative journey, and I'm eager to embrace all the captivating experiences that lie ahead.

the photography field has become increasingly inclusive and diverse, with many women and girls pursuing their passion and making significant contributions to the art of photography. This trend is not only heartening but also essential for the industry's growth and representation.

In recent years, the barriers that once limited women's involvement in various fields, including photography, have gradually been breaking down. Women and girls have been fearlessly stepping into the photography arena, challenging stereotypes, and reshaping perspectives. Their unique artistic visions and perspectives add a fresh and enriching dimension to the industry, creating a more inclusive and well-rounded representation of the world.


AI was already making significant strides in the field of photography,

AI should be seen as a powerful tool to augment and assist photographers, allowing them to focus more on the artistic and storytelling aspects of their craft. The future of photography is indeed exciting with the integration of AI technologies, but human creativity and skill will continue to be at the core of producing compelling and meaningful images.

You are always welcome; we are ready to serve u as per your requirements

**Regards Abhijit Gujar Photography**
**9822030520**












# सरीवरसरी

## युरोप ट्रिप...
## प्राग, व्हिएन्ना, बुडापेस्ट

**निलिमा क्षत्रिय**

आज माल्मोहून प्रागला निघालो. त्यासाठी फ्लाइट डेन्मार्कमधील कोपनहेगन वरून होती. फ्लाइट सकाळी आठची होती. पहाटे पाचलाच घरातून निघालो. बसने ट्रँगलीन, ट्रँगलीन वरून ट्रेनने कोपनहेगन गाठलं. वेळेचं गणित अगदी कट्टाकट्टी होतं. शक्यतोवर एकही बस किंवा ट्रेन चुकवून चालणार नव्हतं. तरीही ट्रँगलीन वरून पोहोचणारी ट्रेन दोन मिनिटाने हुकलीच. पण इथे बसेस किंवा ट्रेन्सची फ्रिक्वेन्सी चांगली आहे, त्यामुळे वेळेत विमानतळावर पोहोचलो. फ्लाइट अवघी तासाभराचीच होती. कमरेचा बेल्ट बांधे सोडेपर्यंतच प्राग आलं पण. प्रागला उतरल्यावर पुन्हा बस, ट्रेनचा प्रवास करून प्राग शहरात पोहोचलो. रेल्वे स्टेशन बाहेर पडल्याबरोबर आधी काय जाणवलं तर सिगरेटचा वास. आजूबाजूला झाडे हिरवळ, त्यावर बाक, कट्टे, आणि मोठ्या संख्येने स्मोकिंग करणारे स्त्री पुरूष. मजा मस्तीच्या मूड मधले तरूण तरूणी. युरोपमध्ये असं वातावरण पहिल्यांदाच दिसलं. जरा बकालच वाटलं. मनात थोडंसं चर्र झालं. काय वाढून ठेवलंय पुढे असं झालं. स्टेशन सोडून एक टर्न घेतला आणि पुढचं दृश्य पाहून आँखे 'फटी की फटी रहना' असं झालं. एखाद्या 'स्वप्नातल्या गावा' यावं तसं. जरा अरूंद रस्ते आणि त्याच्या बाजूने वास्तूशास्त्राचा अजोड नमुना असलेल्या इमारती. प्रत्येक रस्त्यावरचं वळण संपलं की एखादी आणखी अतीसुंदर वास्तू शेवटाला उभी. सगळ्या इमारतींचं वय शेकड्यात पण अतिशय सुस्थितीतल्या. मुख्य म्हणजे वापरातल्या.

प्राग हे वाल्टावा नदीच्या किनारी वसलेले अतिशय रम्य शहर आहे. चारही बाजूने उतरते डोंगर आणि मध्ये शहर. संरक्षण आणि लढाईचे डावपेच, दोन्हीसाठी योग्य.

एकोणीसशे अठरामध्ये झेकोस्लोव्हाकिया स्वतंत्र झाला. त्यावेळी इथे झेक व स्लाविक असे दोन जमातीचे लोक रहात होते. पण त्यांच्यात हळूहळू वाद निर्माण झाले व आपण आता एकत्र राहूच शकत नाही ह्या निर्णयापर्यंत ते आले. १९९३च्या दरम्यान झेक व स्लाव्हिक लोकांमध्ये जनमत चाचणी होऊन शांतपणे देशाचे विभाजन करण्यात आले. ह्या घटनेला इतिहासकार वेलवेट रेव्होल्युशन किंवा मखमली तलाक असे संबोधतात. विभाजनानंतर झेक आणि स्लाविया ह्या दोन राष्ट्रांची निर्मिती झाली. तर ह्या झेक रिपब्लिकची राजधानी प्राग. रोमन, गॉथिक शैलीच्या आर्किटेक्चरनुसार बनलेल्या इथल्या इमारती शहराच्या सौंदर्यात भर घालतात. अरूंद दगडी रस्ते, त्यावरून टाकलेले ट्राम चे ट्रॅक्स, मिनिटा मिनिटाला धडधडत जाणा–या ट्राम्स. सुळसुळत पळणा–या आलिशान गाड्या आणि चकीत चेह–याने फिरणारे पर्यटक.

कम्युनिस्टांच्या तावडीतून सुटल्यानंतर दोन दशकांपासून प्राग हे युरोपियन लोकांचे आवडते पर्यटन स्थळ बनले आहे. इतर युरोपियन देशांच्या मानाने स्वस्तही असल्याने युरोपियन

तरूणांची पर्यटन, मौजमजेसाठी प्रागला पसंती असते. ह्या तरूण पर्यटकांमुळे विदेशी चलन मोठ्या प्रमाणात येते पण त्याचबरोबर प्रागची सांस्कृतिक परंपरा आणि शांती त्यामुळे डळमळीत होऊ लागल्याची खंत इथले लोक व्यक्त करतात. (एका म्युझियमच्या म्हाता–या अटेंडंट बाईला माहितीसाठी विचारलं. आम्ही स्वीडनवरून आलोय म्हटल्यावर तिचं कोणतं तरी भावनीक बटन दाबलं गेलं होतं. तिचा नवरा युद्धकाळात स्वीडनला बरेच दिवस राहिला होता. त्या आठवणी तिने पटकन आमच्या कानावर उगाळून घेतल्या.)

स्मोकिंगच्या बाबतीत प्राग वरच्या क्रमांकावर आहे. रस्त्याने ब–याचदा बायका माणसांच्या तोंडातून सुटणा–या धुरातून वाट काढावी लागते.

Airbnb चा ३ बीएचके फ्लॅट बुक केलेला होता. चहापाणी, माफक स्वयंपाक करता येईल अशी भांडीकुंडी इथे असतातच. पण अगदी डिशवॉशर, वॉशिंग मशिनपासून कुकिंग रेंजपर्यंत सगळंच होतं. आणि 'सोने पे सुहागा' म्हणजे बिल्डिंगच्या समोरच इंडियन वस्तूंचं स्टोअर्स होतं. भराभर तिथून साखर, दुध, ब्रेड, बटर, फळं वगैरे सामान आलं. ('अहमद' नावाचा एक चहा इथे सापडला. अगदी आपल्या सपट सारखा कडक) कडकडीत चहा घेऊन बाहेर पडलो. एअरपोर्टवरून उतरल्या बरोबर प्राग फिरण्यासाठीचे चार दिवसांचे पासेस काढले होते. ह्या पासवर चार दिवस तुम्ही प्रागमध्ये बस, ट्राम, ट्रेन कशानेही कितीही वेळा, कुठेही, कितीही लांबचा प्रवास करू शकता. लगेच ट्राम पकडून एक चक्कर शहरात मारून आलो. सगळीकडे गर्दीच गर्दी दिसत होती. युरोपात आल्यापासून इतकी माणसं प्रथमच दिसत होती. लोक घोळक्या घोळक्याने फिरत होते. मुला–मुलांचे, मुली–मुलींचे, बायका–बायकांचे घोळके, तरूण जोडपी, काही कुटुंबं, लहान मुलाबाळांसह, काही छोट्याछोट्या कुत्र्यांसह रस्त्यावर दिसत होती.

आम्हीपण त्यात मिसळून गेलो. आम्ही उतरलेल्या फ्लॅट शेजारीच प्रसिद्ध वेन्सेसलेस चौक होता. (वेन्सलेस, की वेल्नेस की वेन्सलांस? इथले स्पेलिंग्ज वाचताना जीभेला गाठ बसायची वेळ येते) चढावावर समोरच नॅशनल म्युझियमची भव्य राजवाडाच वाटावा अशी इमारत. प्रवेशद्वारावर सेंट वेन्सेसलासचा मोठा पुतळा आणि पुढे प्रशस्त चौक आहे. हे प्रागचं मुख्य आकर्षण स्थळ. टुरिस्ट कंपन्या ह्या चौकात एखादा तास टुरिस्टना हिंडायला सोडतात. तासाभराने गाडीत भरून घेऊन जातात. आम्ही ह्या चौकाजवळच उतरलेलो होतो, त्यामुळे चार दिवसात किती तरी वेळ तिथे घालवायला मिळाला. ह्या चौकात बरीच हॉटेल्स आहेत. तिथे लोक रस्त्यावर टाकलेल्या टेबल खुर्च्यांवर खातपीत बसलेले होते. इथे बरेच सांस्कृतिक कार्यक्रम, राजकीय सभा वगैरे होतात. सगळीकडे अनोळखी भाषा, अनोळखी लिपी, अनोळखी पदार्थ, अनोळखी लोक.

अंधार पडायला लागला तशी हॉटेल्सवरून शोधक नजर फिरायला लागली. दोन तीन भारतीय हॉटेल्स दिसली. एकात घुसलो. तिथे काही युरोपियन मुले तंदुरी रोटी आणि बटर चिकन खात बसलेली होती. नंतर आणखी एक युरोपियन ग्रुप आला. ते आम्हाला पाहून आपापसात म्हणाले, 'जिथे इंडियन जास्त दिसतात, ते हॉटेल चांगलं असतं'. टिपिकल भ्रष्ट चवीच्या, साखर घातलेल्या गोड चवीच्या पंजाबी डिशेस होत्या. पण त्यांना चांगलं कसं असतं ते कुठे माहीत होतं, त्यामुळे ते आमच्या कडे पहात पहात मिटक्या मारत खात राहिले.

हॉटेलवाला हिंदीत बोलत होता. पण तो भारतीय नव्हता तर श्रीलंकन होता. आम्ही जेवताना त्याने म्युझिक सिस्टीमवर लगेच हिंदी गाणी लावली. बाहेर पर्यटक लाटांसारखे रस्त्यावरून वहात असलेले. जेवण झाल्यावर



नेहमीप्रमाणे चौकशा, 'कुठून आले, कुठे उतरले'? मग आम्ही 'कधीपासून इथे आहात'? वगैरे वगैरे.

फ्लॅट समोरंच भारतीय सामानाचे जे दुकान सापडलं होतं. त्याही दुकानदाराशी हिंदीत वार्तालाभ केला असता तो पाकिस्तानी निघाला.

देशाच्या बाहेर पडले की श्रीलंकन काय आणि पाकिस्तानी काय सगळे आपले वाटतात. हिंदी भाषा ऐकली की आनंद होतो.

दुस–या दिवशी सकाळीच बाहेर पडलो तर युरोपियन टुरिस्ट लोकांचे घोळकेच्या घोळके बाहेर पडत होते. हॅट स्कार्फ ओव्हरकोट वगैरे घातलेले, हटके दिसणारे. इथेपण स्वीडनमधील लुंड प्रमाणेच मोठं घड्याळ आहे ओल्ड टाऊन स्क्वेअरमध्ये. हा स्क्वेअर पण भला प्रशस्त आहे पण मुंगी शिरायला जागा नाही इतकी गर्दी होती. घड्याळाचे टोल पहायला सगळे जमतात. एकदा टोल पडले की पुढे निघतात, पुन्हा मागून दुसरा जमाव येतो. गर्दी मोड कंटिन्यू. चौकात मोठमोठे पुतळे, चर्चेस, राजवाडा सदृष इमारती आहेत. त्यांच्यासमोर लोक फोटोसेशन करत रेंगाळत असतात. जुन्या काळातल्या घोडा गाड्या, विंटेज कार्स फेरीसाठी उपलब्ध असतात. लोक मुलाबाळांसह फेरीचा आनंद लुटतात.

शेजारीच छोटासा पार्क आहे, तिथे लहान–लहान झाडांखाली मद्यविक्रेत्यांनी टेबलं टाकून मद्यप्रेमींची सोय केलेली. सिगारेटच्या धूरात अनेक बाया–बाप्पे तिथे मद्याचा आस्वाद घेत बसलेले. शेजारीच भल्यामोठ्या भट्टीवर मोठमोठे मांसाचे खंड मोठ्या सळीवर गोलगोल फिरत भाजले जात असलेले.

युरोपियन लोक कधी नव्हे ते मोठ्याने बोलताना, सिगरेटच्या थोटकांचा कचरा करताना दिसतात. आपले लोक स्वतःच्या देशात घाण करतील पण बाहेर गेल्यावर, गो–यांच्या धाकाने किंवा देशाचं नाव खराब होऊ नये म्हणून शहाण्यासारखं वागतात.

इथे एकच पण सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे जिथे पाच पंचवीस तरी टॉयलेट्स पाहिजे होती तिथे एकही टॉयलेट दिसत नाही. थंड प्रदेशात पर्यटनाला निघाल्यावर तहान फारशी लागत नाही. पण म्हणून पाणी न प्यायल्याने डिहायड्रेशन होतं. म्हणून बळंच पाणी, कोक वगैरे प्यावं तर लगेच टॉयलेटची निकड भासते. मग जिवाच्या आकांताने टॉयलेटचा शोध सुरू होतो. बरीच शोधाशोध केल्यावर, भाषेची बोंबाबोंब असल्याने (इथे आणखीच वेगळी स्लाव रशियन भाषा, इंग्रजीला कोणी तोंड पटकन उचकटत नाही) गोंधळ्याच्या खुणा करत, मॉलमध्ये जा वर ये खाली, जा डावी कडे, जा उजवीकडे करत करत टॉयलेटचा बोर्ड दिसावा तर तिथली बाई लगेच बोटांनी खुणा करून दहा वीस क्रोनाची मागणी करते, की गुणिले दोन चार मेंबर्स करून पाच पन्नास क्रोना तिला वाहून तिथून निघायचं. एखाद्या हॉटेलमध्ये खायला गेल्यावर खाण्याआधी आणि खाण्यानंतर दोनदा हॉटेलच्या टॉयलेटला जाऊन आलं तरी खाण्याचे निम्मे पैसे वसूल केल्याचं समाधान.

वेन्सेसलास चौकातील मिनरल्सचे नॅशनल म्युझियम, चार्ल्स ब्रिजवरील राजघराण्यातील व्यक्तींचे पुतळे, भव्य प्राग कॅसल वगैरे प्रेक्षणीय स्थळे प्रागची शान म्हणावेत अशीच आहेत. ट्रामने, बसने, बोटीने तीन दिवस प्राग पिंजून काढले. कंटाळा येईपर्यंत फिरलो. पहिल्या दिवशी ज्या इमारती पाहून डोळे फाटले होते त्या इमारतींपुढून बसमधून जाताना अक्षरशः डुलक्या मारल्या. चौथ्या दिवशी प्राग सोडले आणि व्हिएन्ना ऑस्ट्रियाला गेलो. (प्राग बद्दल लिहिण्यासारखं खूप आहे पण विस्तारभयास्तव सध्या एवढंच)

**– नीलिमा क्षत्रिय**





*Family ke saath*
***peaceful retired life enjoy karo...***

***Apke apne Retirement ke liye,***
***Aaj hi SIP shuru kare.***

*#RetirementKiSIP*

SIP SYSTEMATIC INVESTMENT PLAN IN EQUITY MUTUAL FUNDS
Contact your **NJ Wealth** Mutual Fund Distributor.
NJ INDIA INVEST PRIVATE LIMITED - AMFI REGISTERED MUTUAL FUND DISTRIBUTOR
Mutual Fund investments are subject to market risk, Read all scheme related documents carefully.

**ANVI ANIKET ANAJPURE**
**MOBILE: 8669087733**
EMAIL: ANVI.ANAJPURE@GMAIL.COM



# हसत खेळत शिका
# शास्त्रीय संगीत!

शास्त्रीय संगीत , नृत्य हया कलांना अलीकडे प्रेक्षकांचा प्रतिसाद कमी मिळत आहे असे प्रकर्षाने जाणवते. त्याची असंख्य कारणे आहेत. संगीताचा प्रचार आणि प्रवास हा बदललेल्या स्वरूपात पहायला मिळतो. खर तर शास्त्रीय संगीत हा कोणत्याही प्रकारच्या संगीताचा पाया आहे . परंतु चित्रपट संगीत पाश्चात्य संगीत यांच्या प्रभावाखाली भारतीय शास्त्रीय संगीत मागे पडत चालले आहे अशी मनाला थोडी भीती वाटते . आणि त्यासाठी हा लेख लिहावयाचे ठरवले. शास्त्र शुद्ध पारंपरिक पद्धतीने, अशा प्रकारचे शिक्षण अवगत करण्या ऐवजी इतर काही करू शकतो का ? असा विचार मनात आला आणि त्याचा अभ्यास सुरू झाला.


शास्त्रीय संगीत शिकणे आणि ऐकणे ही एक प्रकारची कला आहे. त्यासाठी मुबलक वेळ आणि अथक परिश्रम करण्याची तयारी हवी , पण आजच्या पिढी मध्ये दोन्ही गोष्टींचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. सुर आणि ताल हा संगीताचा श्वास आहे. स्वर आणि तालाचे ज्ञान जितके चांगले तितके गाणे उठावदार असे सरळ समीकरण आहे. ह्यातील स्वर ह्या विषयाबद्दल थोडे जाणून घेऊया. संगीतामध्ये मुख्य १२ स्वर आहेत त्यामधील शुद्ध स्वरांचा अभ्यास आपण सहज सोप्या मार्गाने कसा करू शकतो ह्या विषयी मी आपल्याशी संवाद साधणार आहे . आपल्या दैनंदिन जीवनामध्ये कितीतरी प्रचलित गीत रचना आहेत ज्या शुद्ध स्वरांच्या सुरावटीवर गुंफलेल्या आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर साधी गणपतीची आरती ‘ सुखकर्ता दुखहर्ता ..’ ह्याची सुरावट ही शुद्ध स्वरामध्ये आहे . सा सा सा , सा सा सा ,सारेसानि ,सा रे ग म ग रे ,सा रे सा सा सा .. आहे की नाही गंमत ! अशा अनेक सुरावटी आहेत. तसेच छोट्या मुलांसाठी उत्तम उदा. म्हणजे इंग्रजी भाषेतील राईम्स ‘ट्विंकल ट्विंकल लिटिल स्टार .. ’ त्याची सुरावट अशी आहे सा सा प प ध ध प म म ग ग रे रे सा




**डॉ. अनघा हिंदळेकर**
९८८६३००२९६


अशी अनेक गमतीशीर उदाहरणे आहेत . शास्त्रीय संगीताच्या बैठकीसाठी पारंपरिक गुरुशिष्य परंपरेत स्वर अलंकार च्या माध्यमातून स्वरांचा अभ्यास करणे ही तर उत्तम पद्धत आहे. पण शास्त्रीय संगीता प्रती आवड निर्माण करण्यासाठी वेगळ्या वाटा शोधणे ही काळाची गरज आहे असे मला वाटते. आणि त्यासाठी पारंपरिक आणि प्रचलित स्वर रचनांचा अभ्यास करून हे सहज शक्य आहे.

अस्सल शास्त्रीय संगीत म्हणजे बडा खयाल गायकी आणि ती साध्य करण्यासाठी एक जन्म ही अपुरा पडेल पण शास्त्रीय संगीताबद्दल जर अशा निराळ्या पद्धतीने विचार केला तर समाजामध्ये शास्त्रीय संगीताप्रति आवड निर्माण होईल असा मला विश्वास वाटतो. आणि ह्या लेखाद्वारे माझे विचार तुमच्यापर्यंत पोहोचवण्याचा हा छोटासा प्रयत्न !

# संपूर्ण राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे, भारत भाग्य विधाता
पंजाब सिंधु गुजरात मराठा द्राविड उत्कल बंग
विंध्य हिमाचल यमुना गंगा उच्छल जलधितरंग
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिष मागे
गाहे तव जय गाथा
जनगणमंगलदायक जय हे, भारत भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे ।।१।।

अहरह तव आव्हान प्रचारित सुनि, तव उदार वाणी
हिंदु, बौद्ध, सिख, जैन, पारसिक, मुसलमान, ख्रिस्तानी,
पूरब पश्चिम आसे, तव सिंहासन पासे
प्रेमहार हय गाथा
जनगणऐक्यविधायक जय हे, भारत भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे ।।२।।


पतनअभ्युदयबंधुर पंथा युगयुग धावित यात्री
तुम चिर सारथी, तव रथचक्रे मुखरित पथ दिन रात्री
दारुण विप्लव माजे, तव शंखध्वनि बाजे
संकंट दुखयात्रा
जनगण पथ परिचायक जय हे, भारत भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे ।।३।।

घोरतिमिरघननिबिड निशीथे पीडित मूर्छित देशे
जागृत छिल तव अविचल मंगल नत नयने अनिमेषे
दुःस्वप्ने आतंके, रक्षा करिले अंके
स्नेहमयी तुमी माता
जनगण दुःख त्रायक जय हे, भारत भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे ।।४।।

रात्र प्रभातिल उदिल रविच्छवि पूर्व उदयगिरि भाले
गाहे विहंगम पुण्य समीरण नवजीवन रस ढाले
तव करुणारुण रागे, निद्रित भारत जागे
तव चरणे नत माथा
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय जय हे भारत भाग्यविधाता ।।५।।

**– रवींद्रनाथ टागोर**





# बाप.........दादा!

माझ्या गावी शाळा नव्हती. त्यामुळे मला माझ्या आजोळी पहिल्या वर्गात घातले होते. तेथे मामा अन् मी शाळेत जायचो. सकाळीच उठून गाईबैलांचं शेण काढावे लागे. चहा पिऊन मामा अन् मी बैल चारायला घेऊन जायचो. असेच दिवस जात होते. घरची, मायची दादाची खूप आठवण यायची. कोणीही भेटायला येत नव्हते. दसरा, दिवाळी गेली पण कोणीच आले नाही. तीळ संक्रांत झाल्यावर अचानक दादा भेटायला आले. मला खूप आनंद झाला. दादाने आमच्यासाठी शेवचिवड्याचं भात्कं आणल होते. माझ्या अंगावरचे कपडे पाहून दादा म्हणाले,

'' तुझा सदरा कसा काय फाटला?''

मी म्हणालो, ''मले एकच शर्ट हाये/ हेच घरी अन् शायेत घाया लागते.''

दादाजवळ मला शर्ट विकत घेण्यापुरते पैसे नव्हते. दुसऱ्या दिवशी दादाने तेथे एका शेतकऱ्याची दोन एकर तूर कापणीसाठी घेतली. आज्याच्या घरून विळा अन् शिदोरी घेतली. मलाही सोबत नेले. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तूर कापून पेंड्या बांधल्या. पुन्हा सकाळी जाऊन गंजी लावली. कामाचे पैसे घेतले. मला घेऊन तडक शिंप्याचे घर गाठले. शिंप्याजवळ विकण्यासाठी थोडेफार कपडे होते पण पसंत पडण्यालायक कापड नव्हते. शहरात जाऊन कापड खरेदी करून आणण्याइतका दादाला वेळही नव्हता. त्यातलाच एक निळ्या रंगाचे कापड पसंत करून संध्याकाळी शिवून देण्याच्या बोलीवर दादाने शिंप्याला पैसे दिले. माझे माप घेतले. आपल्याला संध्याकाळी नवीन शर्ट मिळणार याचा आनंद कोणाला सांगू अन् कोणाला नाही असे झाले होते. माप देऊन मी शाळेत गेलो. दुपारच्या सुट्टीत शिंप्याकडे एक चक्कर टाकली. त्याने कापड कापले होते. एक दोन तासात शिवून होईल. संध्याकाळी ये म्हणून सांगितले. मी तसाच शाळेत गेलो मास्तरांच्या शिकवण्याकडे माझं लक्ष नव्हतं. डोळ्यापुढे सतत नवीन सदरा नाचत होता.

पाचची घंटा झाली. मी दप्तर घेऊन शिंप्याच्या घराकडे धावत सुटलो. शिंपी सदऱ्याला काजबटण करत होता. दादा पुढे बसले होते. शर्ट तयार झाला. माझ्या हातात दिला.

दादा म्हणाले, ''घालून पाय बरं''

मी लगेच जुना शर्ट काढून नवा शर्ट घातला. थोडासा ढगळ शिवला होता.

दादा लगेच म्हणाले, ''असाच पायजे वाढत्या अंगाचा.''

शर्टचा कपडा जाड होता. बरेच दिवस तो फाटला नाही. नंतर मला कळलं ते कापड मुलींच्या स्कर्टच होत.

तिसऱ्या दिवशी दादा गावी परत गेले.

''पुढच्या वर्षी तुले गावाजवळच्या सरूयच्या शाळेत टाकतो. चांगला अभ्यास कर. तू सायेब झाला पायजे.'' हे त्यांचे शब्द मला आजही आठवतात.

पुढच्या वर्षी मला ते गावी घेऊन आले. कष्टाची कामे अन् खंती खोदून दादाला छातीचे दुखणे सुरू झाले. दोन तीन वर्ष दादा आजारी होते. मी चौथीत असतानाच दादा हे जग सोडून गेले.

त्यांनी पाहिलेले स्वप्न मला पूर्ण करता आले नाही. मी साहेब नाही पण शिक्षक होऊ शकलो हे त्यांच्या सतत आठवणीत राहिलेल्या शब्दांनी ! कदाचित दादा असते तर त्यांचे स्वप्न पूर्णत्वास जाऊ शकले असते.

**लेखन–प्रदीपकुमार जाधव,**
हनुमान टाऊन, धामणगाव, रेल्वे, जि. अमरावती
संपर्क – ९९७५०५४२५५

# बाप नावाचा माणूस

या तिन शब्दांवर लिहिण्याची संधी जेव्हा चालून आली तेव्हा 'माझ्यातल्या लेकींनी' अत्यानंदाने टुडकन उडी मारली. कारण बाबा आणि माणुस या दोन्हींसह ते मला आत्यंतिक प्रिय आहेत.

दोन मुलांनंतर मुलगी हवी ही इच्छा आणि दिवाळीतल्या पाडव्याला झालेला माझा जन्म या दोन 'चीजांमुळे.'

माझे अवघे जीवन सुरेल झाले. तो काळ (जवळपास साठ वर्षांपूर्वी) स्पर्शातून प्रेम दर्शवायचा नव्हता. कधी बाबा म्हणून मला मिठी मारल्याची किंवा त्यांनी लाड करण्यासाठी जवळ घेतल्याची स्मृती मन:पटलावर शोधुनही सापडत नाही. अगदी लग्नानंतर वरात निघतानाही ते दूर बसून होते. लग्नाचा मुहुर्त भल्या पहाटेचा असल्याने सर्व विधी होऊन दुपारी वरात निघण्याची तयारी झाली. पण बाबांनी सासऱ्यांना थोडा वेळ थांबण्याची विनंती केली, त्यावर संध्याकाळी सर्व पाहुण्यांच्या जेवणाची सोय करायची असल्याने आता निघायला हवं हे उत्तर मिळाले. तेव्हा संध्याकाळी जेवण करूनच निघा असं म्हणत किमान शे-दोनशे वऱ्हाडी मंडळीच्या जेवणाची तयारी करण्याची सुचना पाठवली गेली. कुणाची बिशाद होती माझ्या या गोड बापाला नाही म्हणण्याची? रात्रीचे जेवण करून आम्ही निझालो आणि तोवर रोखून ठेवलेले बाबांच्या मनातले ढग घरी गेल्यावर माझ्या कपाटाजवळ जाऊन कोसळले. स्पर्शा पलिकडे असलेले हे आगळे प्रेम कायम अमीट आहे, म्हणूनच ते नसले तरी या बापाच्या मायेचा ओलावा कायम आहे.

माणुस म्हणून जेव्हा मी त्यांच्याकडे पहायला शिकले तेव्हा त्यांची माझ्यावर पडणारी सावली अधिक विशाल झाली. घरातल्या काम करणाऱ्या बाईच्या पतीचे अकस्मात निधन झाले दोन मुलांसह ती उघड्यावर आली. अनेक वर्ष सतत अविरोध नगरपालिका सदस्य म्हणून निवडून येणाऱ्या या 'माणसाने' तिला कायमस्वरूपी घर मिळवून दिले. पुढे त्यांची मुलं मोठे होऊन त्यांचे लग्न कार्य करून देण्यापर्यंत आई बाबा त्यांच्यासोबत होते.

बाबा वेटरनरी डॉक्टरच्या शेवटच्या वर्षाला असताना शेती घेतली म्हणून आजोबांनी या मोठ्या मुलाला शिक्षण सोडून शेती करायला बोलावून घेतले. या शिक्षणाचा उपयोग दुग्ध व्यवसाय करताना नक्कीच झाला असावा पण शिक्षण सोडताना काय वाटलं ? हा प्रश्न त्यांच्या सोबत अनुत्तरीतच गेला. सडकेला लागून असणाऱ्या शेतीमध्ये भाजीपाला, भरपूर फुलं पिकवून; गुराढोरांचे यथोचित संगोपन करून आर्थिक समृद्धी मिळवली. अर्थात अपार कष्ट दिन-रात घ्यावे लागायचे. रस्त्यालगतच्या शेताची सीमा जिथुन सुरू व्हायची तिथे एक मोठ्ठा काळा दगड आणि त्याच्या मधोमध एक लोखंडी चपटा खांब होता. त्याला टेकुन बसणाऱ्या या राजासमोर पंचक्रोशीतील जनता आपले गाऱ्हाणे घेऊन यायची. यथाशक्ती त्यांच्या अडचणी सोडवण्यात मग्न असलेला हा 'माणुस' बाबा म्हणून फार कमी वाट्यास आला. घराच्या पायरीवर बसुन गावातलं राजकारण सांभाळणं, उत्सव-यात्रा-मिरवणुका दरम्यान शांतता कमिटीवर राहून सलोख्याचे वातावरण निर्माण करणं असे एक ना अनेक पैलू वाढत्या वयासोबत माझ्यादृष्टीस पडू लागले. वेळी अवेळी मदत केलेले लोक जेव्हा भरल्या डोळ्यांनी धन्यवाद द्यायला घरी यायचे. शब्द सुचायचे नाही त्यांना, तेव्हा आशीर्वादासाठी हात उंचावून तृप्त मनाने परत जायचे. ते चेहरे, ते हात मी कधीच विसरू शकले नाही. आज माझ्या आनंदी जगण्यामागे हेच आशीर्वाद आहे हा विश्वास आहे. केव्हातरी मी ही याच वाटेवरून जाईल हा निश्चय केल्याच आठवतं. आज समाधानी आहे की गेली पंढरा वर्ष दृष्टिहीन मुलांसाठी काम करते आहे. त्यांना शिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभं राहिलेले बघते आहे. वाईट वाटतं ते हे की हे सारं बघायला बाबा नाहीत. वाटतं एकदा तरी मिठी मारून सांगायच राहून गेलं की तुमच्या या दुहेरी सावलीत मी वाढले, जी केवळ मध्यान्नाच्या वेळेतच नाही तर अष्टौप्रहर सोबत होती...... आहे आणि ती मला खूप प्रिय आहे अगदी तुमच्याइतकीच !

आज जेव्हा जेव्हा माझी मुलगी ''बाबा'' म्हणून यांना बिलगते, तेव्हा तेव्हा बाबा मी तुम्हाला मिठी करते. बाकी एरवी तर तुम्ही असताच माझ्या सभोवती...... माझी सावली बनून.


**लेखन - सौ. मंजुश्री गोविंद कुलकर्णी,**

शास्त्रीनगर, अकोला

संपर्क - ९८५०३२२६७८

Email ID – mkmanjukulkarni@gmail.com

# बाप नावाचा माणूस

आयुष्यामध्ये बापाच्या छत्र छायेपुढे सर्व सुखे लहान आहेत. बाप असला ना की सुखाला नसते माप, आयुष्याच्या लढाईत धावण्याची मग लागत नाही माप, किती वारेमाप पैसा खर्चू देत त्याचे होत नाही मोजमाप, जीवनातल्या प्रत्येक संकटांना लागतो मग चाप, जेव्हा पाठीशी कायम असते बाप नावाची छाप. माझ्या आयुष्यात अनेक संकट आली पण अशा काळामध्ये माझी ढाल म्हणून माझ्या पाठीशी कायम उभा राहिला तो माझा बाप. माझ्या बापासाठी मला एकच म्हणावसं वाटतं,

बाप माझा साधा भोळा
नाही खोटं त्याच्या मनी
कष्ट त्याचे हो देखुनी
येते नयनाले पाणी

आम्ही पाच भावंड, तीन बहिणी, दोन भाऊ. आमचा परंपरागत लोहारी कामाचा व्यवसाय. आमच्या बापाने खूप कष्ट केले आणि आम्हाला खूप शिकवलं. हातावरचा संसार, काम मिळेल तर खायला मिळेल अशी आमची परिस्थिती होती. दहा ते पंधरा किलोमीटर सायकल वर जाणे बैलांना पत्र्या मारणे, बैलगाड्यांच्या धावा चढवणे असे कष्टाचे माझ्या वडिलांचे काम होते. आता बैल कमी झालेत, लाकडी बैलगाड्या नाही म्हणून ती आता जास्त दिसत नाहीत. ऊन, वारा, पाऊस, थंडी कितीही असू देत पण माझे वडील मात्र कधीच घरी राहिले नाही. कधीच त्यांनी आराम केला नाही, आजारी जरी पडले ना लगेच दुसऱ्या दिवशी कामावर जायचे, आळस त्यांच्या उभ्या आयुष्यात मी कधी पाहिलाच नाही. त्यांच्या कष्टामुळेच आज आम्ही पाची भावंड चांगल्या परिस्थितीत जगत आहोत, म्हणूनच आज,

बाप माझा समाधानी
नाही गर्वाचा रो धनी
देखुनी त्याचा नम्रपणा
कर जुळती अभिमानी

सरकारी नोकरीत असलेल्या आमच्या काकांची मुलं आज मजूर म्हणून काम करत आहेत, कोणी वेल्डिंग काम करतो, कोणी मेकॅनिक आहे पण माझ्या वडिलांच्या कष्टामुळे आज आम्ही स्वतःच्या पायावर उभे आहोत. माझ्या मोठ्या दोन्ही ताई उद्योग चालवतात, मोठा भाऊ एम.आर. आहे. माझ्या वडिलांच्या पुण्याईमुळेच मी आज शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार, उपक्रमशील शिक्षक पुरस्कात, नारीरत्न पुरस्कार, शिक्षण भूषण पुरस्कार हे सर्व मिळालेले पुरस्कार ही केवळ माझ्या आई वडिलांची पुण्याई आहे. माझ्या आयुष्यात अनेक वादळं आली पण त्या परिस्थितीत खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे राहिले ते माझे वडील. त्यांनी माझ्या लहान लेकराला सांभाळले व नव्याने उंच मोकळ्या आभाळी भरारी घेण्याची जिद्द निर्माण केली. त्यांच्या भक्कम आधारामुळेच मी माझ्या वाईट काळात परिस्थितीवर मात करत एवढे पुरस्कार मिळविले व माझी नोकरी खंबीरपणे करू शकले. त्यांच्याच आशीर्वादाने व भक्कम आधारामुळेच मी माझे स्वप्नाहुन सुंदर घरटे निर्माण करू शकले. माझा सगळ्यात लहान भाऊ म्हणजे आमचे शेंडेफळ तोही आज गखज  मध्ये इंजिनिअर आहे. हे सर्व वैभव आम्ही जे आज बघत आहोत ना ते आमच्या बापाच्या अहोरात्र ऊन, वार, पाऊस, थंडी झेलत केलेल्या कष्टाचे फळ आहे. खरं सांगू का बाप नावाचा माणूस नसतोच मुळी तो तर देव असतो जो कधीही आपल्या लेकराला एकटं पडू देत नाही, एकटं लढू देत नाही, एकटं रडू देत नाही आणि संकटांची डोंगरं एकटं चढू देत नाही. सदैव सोबत असतो तो आयुष्याच्या प्रत्येक क्षणी. शब्द अपुरे पडतील असे आहे माझ्या बापाचे ऋण, शेवटी एवढंच सांगेन,

बाप माझ्यासाठी देव
देवा, धन्यवाद तुझा, पोटी येवुनिया त्याच्या
जन्म झाला सार्थक माझा

**श्रीमती सोनाली भगवान,**
गाडीलोहार (प्रा.शिक्षिका)
शिरपूर, शिरपूर, जि. धुळे

# Anxiety







आपल्या प्रत्येकीलाच कोणत्या ना कोणत्या गोष्टीची काळजी वाटत असते पण जेव्हा या अती काळजीने आपले रोजचे जगणंसुध्दा अवघड होऊन जाते.. तेव्हा समजून जावे की, या काळजीचे चिंतेत (anxiety) रुपांतर झाले आहे. याच चिंतेवर, अतिरिक्त ताणातून मुक्त होण्यावर काम करण्याच्या हेतूने बिईंग वूमन आणि माईंडफूल शाँटझ् यांनी आजच्या या अनोख्या सेशन चे संयुक्त आयोजन केले होते.आपल्या मनातील ही काळजी वजा चिंता, नकारात्मक विचार, सतत जाणवणारी भीती, स्वतःचा अहंपणा हे शास्त्रशुध्द योगा व ध्यान-प्राणायाम यांच्या मदतीने कसे लांब ठेवता येईल याचे योगा अभ्यासक आदिती केळकर यांनी सहज शब्दांत मार्गदर्शन केले. तसेच समस्या छोटी असो किंवा मोठी त्याचे उत्तर हे आपल्याच पंचमहाभूतांच्या



तत्वांमध्ये कसे दडले आहे हे माईंडफूल शाँटझ्च्या संस्थापिकांनी प्रात्यक्षिकासह उदाहरण देऊन उत्तम प्रकारे समजावून सांगितले. ताणतणाव आणि anxiety वर काम कसे करता येऊ शकते हे जाणून घेण्यासाठी या वेगळ्या सेशनला विविध वयोगटातील महिलांनी हजेरी लावत छान प्रतिसाद दिला.

---

# अद्भुतरम्य, रहस्यमय कहाणी : उजळपरी



अखिल भारतीय साहित्य संमेलन पदी बिनविरोध निवड झालेले मा. ज्येष्ठ कादंबरीकार रविंद्र शोभणे यांचा सातारा साहित्य परिषदेतर्फे जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सातारा शहरातील बालसाहित्यकार सावित्री जगदाळे यांच्या दिलीपराज प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या कुमार कादंबरी 'उजळपरी' या पुस्तकाचे प्रकाशन रविंद्र शोभणे यांचे हस्ते झाले.

'उजळपरी' ही अद्भूतरम्य कहाणी आहे. ही 'उजळपरी' ची मनोरंजक कहाणी लेखिकेने अगदी ओघवत्या शैलीत गुंफलेली आहे. ही 'उजळपरी' ची मन वेधून घेणारी सुलभ कहाणी तुम्हाला वेगळ्या नि अनभिज्ञ अशा जंगल नि परी विश्वाची रंजक नि जादूई सफर घडवून आणेल, यात शंका नाही.तसेच परी, राजकुमार, काकाजी यांचे आपसात होणारे संवाद सुखावून जातील.तसेच सिंह,अस्वल नि साप यांचे कथेत येणे रोमांचकारी असून ते तुमच्या पसंतीस उतरेल. परी लेखिका सावित्री जगदाळे लिखित 'उजळपरी' ची ही हवी-हवीशी वाटणारी रम्य भावकहाणी तुमचे मनोरंजन तर करतेच, पण त्यासोबतच ती तुम्हाला सर्व जीवम ात्रांविषयी सहजीवनाचा विचार करायलाही सहजतेने भाग पाडेल नि पर्यावरण संवर्धनासाठी प्रवृत्त करेल. सर्वांनी आवर्जून वाचावी अशी कादंबरी. सावित्री जगदाळे या बिइंग वुमनच्या देखील लेखिका आहेत.


श्रावण सुरु होण्याच्या आधी एक लास्ट
सेल्फी घेऊयात का ?
श्रावण पाळण्याबरोबर. वेळ पाळणे, लाच न घेणे,
भ्रष्टाचार न करणे, आपले काम प्रामाणिकपणे करणे,
हे का नाही पाळत. तेवढंच पुण्य तरी मिळेल.
आहो ! एक महिना पण तुम्हाला धीर धरता येत नाही का ?
म्हणून काय अख्खा बोकड खायचा का ?

RNI No. MAHMAR/2019/78753

बिइंग वुमन

निबंध स्पर्धा जुलै २०२३
बाप नावाचा माणूस
निकाल

WELL DONE

**प्रथम 5**

1 प्रदीपकुमार जाधव - अमरावती

2 मंजुश्री कुलकर्णी - अकोला

3 श्रीमती सोनाली भगवान गाडी लोहार..शिरपूर धुळे

4 मंजूषा आडवादकर- चाळीसगाव

5 सरोज घाटगे - पुणे

**उत्तेजनार्थ**

शैला सोमण, वारजे पुणे
शीतल दिवेकर, डोंबिवली पूर्व
स्वाती दाढे, पुणे
ज्योती काळे, पुणे
गायत्री फडके, सोलापूर
बबिता चिलवर, जालना
कल्पना आकरे , नागपूर
पर्णवी कुलकर्णी , पिंपरी चिंचवड
अदिती राव , बेंगलोर
गिरीष पाटील

र्व विजेत्यांचे मन:पूर्वक अभिनंदन तसेच या स्पर्धेचे परीक्षण करणाऱ्
परीक्षिका कांचन सावंत, स्वाती यादव यांचे मन:पूर्वक आभार
टीप - विजेत्यांना पारितोषिकांसाठी संपर्क साधला जाईल.





**मेंबरशिप एक वर्षासाठी असेल**
**ऑगस्ट २०२३ ते ऑगस्ट२०२४**
पेमेंट केलेत की तुमचे नाव, नंबर आणि पत्ता पोस्टमध्ये दिलेल्या नंबर वर पाठवा.

**यात काय काय मिळेल?**
वर्षभरात अनेक कार्यक्रम
काही सवलतीत तर काही फ्री
बिइंग वुमनचा डिजिटल अंक
वेगवेगळे इव्हेंट्स, वर्कशॉप, गेटटू गेदर, स्पर्धा
आणि बरंच काही ...

अधिक माहितीसाठी संपर्क
+९१९८२२८६२२५५
+९१९८५०४३३९५४
+९१९५२९६११२१०



**प्रेषक :**
'बिइंग वूमन'
६०३, फिफ्थ अव्हेन्यू,
कोथरूड सिटीप्राईड थिएटर जवळ, पुणे ४११०३८
editorial@thebeingwoman.com
www.thebeingwoman.com
मो. ९८२२८६२२५५ / ८५५२८५७७७९


प्रति,